दै. मराठवाडा नेता

# महापालिका निवडणुकीत वीवीपॅट मशिनीचा वापर

- उमेदवाराला दिलेले मत मतदारालां दिसणार
- देशातील पहिली नांदेड महापालीका ठरणार

■ विश्वास गुंडावार

नांदेड- ऑक्टोबर महिन्यात महानगरपालिकेची पंचवार्षिक निवडणूक होत आहे. यासाठी राजकीय पक्षांसह निवडणूक विभागानेही कंबर कसली आहे. मतदाराने मतदान केल्या नंतर केलेले मतदान योग्य उमेदवाराला पडले असल्याची खात्री आता मतदाराला होणार आहे. या दृष्टीने प्रशासकीय स्तरावर जोरदार हालचाली सुरू झाल्या आहेत. वीवीपॅट या मशिनचे प्रात्यक्षिक सोमवारी महापालिकेच्या स्थायी समितीच्या सभागृहात यशस्वी पार पडले. सर्व काही सुरूळीत पार पडल्यास या मशनिचा वापर करणारी नांदेड महापालिका ही देशात पहिलीच ठरणार आहे.

वोटर व्हेरीफिएलबल ऑडिट ट्रेल म्हणजेच मतदारांने केलेले मतदान योग्य उमेदवाराला पडले याचा तपशिल दर्शविणारी मशिन. या मशिनचे प्रात्यक्षिक सोमवारी दिवसभर देण्यात आले केंद्र सरकारच्या आखत्यारितील असलेल्या भारत ईलेक्ट्रॉनिक लिमिटेड व ईलेक्ट्रॉनिक कॉर्पोरेशन ऑफ इंडिया लिमिटेड या दोन कंपनीनी मिळुन ही मशिन तयार केली आहे. हैद्राबाद येथील या कंपनीचे तीन अभियंते डेमो मशिनसह नांदेडात दाखल झाले होते. सोमवारी त्यांनी प्रत्यक्ष प्रात्यक्षिक करून दाखविले. यावेळी आयुक्त गणेश देशमुख, उपायुक्त रत्नाकर वाघमारे, संभाजी वाघमारे सहाय्यक आयुक्त विलास भोसीकर यांच्यासह सर्व विभागाचे विभाग प्रमुख व निवडणुक संबंधित कर्मचारी उपस्थित होते.

मी अमुक उमेदवाराला मतदान दिले, परंतु ते तमुक उमेदवाराला गेले अशा प्रतिक्रिया अनेक वेळा आपण एकतो. काही दिवसापुर्वी उत्तर प्रदेश विधानसभेच्या निवडणुका पार पडल्या. या निवडणूकीत भाजपाला एकहाती विजय मिळाला. बिएसपी प्रमुख मायावती यांनी पराभावाचे खापर ईव्हीएम मशिनीवर फोडले होते. नांदेडमध्येही अनेकवेळा पराभुत उमेदवाराकडून असे आरोप करण्यात आले आहेत. असे वाद टाळण्यासाठी निवडणूक आयोगाने वीवीपॅट मशिन तयार केल्या आहेत. या मशिनचे वैशिष्ट्य म्हणजे मतदाराने मतदान टाकल्यानंतर मशिनमध्ये लगेच एक पावती तयार होते कोणाला मत दिले त्या उमेदवाराचे नांव व पक्षाचे चिन्ह दिसते, या मशिनच्या वरच्या भागात असलेल्या काचेच्या स्क्रिनवर सात सेकंद ही पावती मतदारांना पाहता येणार आहे. परतु सद्या ही पावती मतदारांना मिळणार नाही यामुळे गोपनियतेचा भंग होऊ शकतो असे निवडणूक आयोगाचे म्हणणे आहे. काही वाद झाल्यास मशिनमध्ये पडलेली मते व मतदान केलेली पावती यांची मोजणी करून वाद मिटवला जाईल. उद्या मंगळवारी राज्य निवडणूक आयोगाचे अव्वर सचिव नि.ज. वागळे व कक्ष अधिकारी अतुल जाधव हे याच मशिनच्या प्रात्यक्षिकासाठी नांदेड दौऱ्यावर येत आहेत. प्रात्यक्षिक यशस्वी झाल्यास आगामी निवडणुकीत हे मशिन वापरण्यावर शिक्कामोर्तब होईल, यानंतर विविध राजकीय पक्षाचे पदाधिकारी, इच्छुक उमेदवार व मतदार यांना विविध मार्गानी प्रात्यक्षिक दाखविण्यात येऊन यासंबंधी जनजागृती करण्यात येईल.

## सर्वप्रथम वापर कुठे

२०१३ साली नागालँड विधानसभा निवडणुकीत या वीवीपॅट मशिनचा सर्वप्रथम वापर करण्यात आला. हा प्रयोग यशस्वी झाल्यानंतर सुप्रीम कोर्टाने केंद्र सरकारला या मशिन बनविण्यासाठी निवडणुक आयोगाला निधी देण्याचे आदेश दिले. ३ हजार एकशे ७४ कोटीचा निधी मंजुर केल्यानंतर आयोगाने ३३ हजार ५०० वीवीपॅट मशिन तयार केल्या. या मशिनचा वापर गोवा विधानसभा निवडणुकीत करण्यात आला.